दिग्रस विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी >> पान 2
पंढरपूर विधानसभा मतदार संघात ३ लाख ७१ हजार २९० मतदार >> पान 3
तरुणांचा विकास हाच आमचा ध्यास : सिद्धार्थ खरात >> पान 4

सुविचार

जो धोका पत्करण्यास कचरतो, तो लढाई काय जिंकणार !

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



'हिरोगिरी फू फू करने मे नही' अक्षय कुमारची ही जाहिरात होणार बंद! आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 71 ■ गुरूवार, दि. 17 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## लाडक्या बहिणींना देवेंद्र फडणवीसांचा मोलाचा सल्ला, काँग्रेसी नेते योजनेविरोधात कोर्टात गेलेत...!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेस पक्षाचे नेते लाडकी बहिण योजना बंद करण्यासाठी कोर्टात पोहोचले आहेत. उद्धव ठाकरेंनीही महायूतीच्या सर्व योजना बंद करण्याची घोषणा केली आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केली आहे. बुधवार, १६ ऑक्टोबर रोजी महायूतीची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. यावेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमचा विरोधी पक्ष लाडकी बहिण योजनेचे पैसे कुठून देणार, अशी टीका करतो आणि दुसरीकडे आमचं सरकार आलं तर आम्ही १५०० रुपयांचे २००० रुपये देऊ असे त्यांचे नेते म्हणतात. त्यामुळे सरकारकडे या योजना चालवायला पैसे आहेत की, नाही हे त्यांनी ठरवायला हवं. आम्ही प्रत्येकाच्या पाठीशी पुर्ण आर्थिक




पाठबळ उभं करूनच योजना जाहीर करू. पण विरोधी पक्ष मात्र, संभ्रमित दिसत आहेत. एकीकडे ते म्हणतात बजेटमध्ये पैसे नाहीत आणि दुसरीकडे वेगवेगळ्या योजना जाहीर करत आहेत. त्यामुळे त्यांचा पर्दाफाश होताना दिसतोय.


काँग्रेस पक्षाचे नेते लाडकी बहिण योजना बंद करण्यासाठी कोर्टात पोहोचले आहेत. उद्धव ठाकरेंनी तर जाहीर सभेत आमचं सरकार आल्यावर महायूती सरकारच्या सर्व योजना आम्ही बंद करू, असं जाहीर केलं आहे. त्यामुळे पुन्हा एकदा स्थगिती सरकार आणून महाराष्ट्राला कुलूपबंद करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पण तो कधीही यशस्वी होणार नाही. विरोधक अनेक आरोप करतात पण कायदा सुव्यवस्थेवर बोलताना त्यांनी आरशात पाहायला हवं. ज्यांचा गृहमंत्रीच तुरुंगात गेला ते आम्हाला कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल सांगत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

## 'मातोश्री'च्या अंगणात ठाकरे की काँग्रेस लढणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली असली तरी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील जागा वाटप अद्याप जाहीर झाले नाही. जागा वाटपाचा तिढा सोडवण्यासाठी दोन्ही बाजूला बैठकांचे सत्र सुरू आहे. महाविकास आघाडीने आपल्यातील जागा वाटपाचा तिढा सोडवण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले आहे. मुंबईतील काही जागांवर असलेला तिढा काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने सोडवला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

मुंबईत विधानसभेच्या ३६ जागा आहेत. त्यापैकी बहुतांशी जागांवर शिवसेना ठाकरे गटाने दावा केला.





काँग्रेसनेही काही जागांवर दावा केल्याने मविआतील तिढा वाढला होता. वांद्रे पूर्व आणि चांदिवली या दोन जागांवर तिढा होता. अखेर या जागांवर तोडगा काढण्यात आला आहे. वांद्रे पूर्व येथील जागेवर शिवसेना ठाकरे गटाचा उमेदवार असणार आहे. तर, चांदिवलीमध्ये काँग्रेसचा उमेदवार असणार आहे. मागील विधानसभा निवडणुकीत वांद्रे पूर्वमधून काँग्रेस उमेदवार झिशान सिद्दिकी विजयी झाले होते. तर, चांदिवलीमधून शिवसेनेचे दिलीप लांडे यांचा कमी मताधिक्याने विजय झाला होता. शिवसेनेतील फुटीनंतर चांदिवलीचे आमदार दिलीप लांडे यांनी एकनाथ शिंदे यांना साथ दिली. तर, झिशान सिद्दिकी हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. काही महिन्यांपूर्वी झिशान सिद्दिकी यांचे वडील आणि माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांनी काँग्रेसचा हात सोडून अजितदादांच्या राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधले होते.

कोण असणार उमेदवार?

महाविकास आघाडीत वांद्रे पूर्व आणि चांदिवली विधानसभा वादावर तोडगा निघाला. वांद्रे पूर्व विधानसभा उबाठा लढवणार तर चांदिवली विधानसभा काँग्रेस लढवणार आहेत. त्यामुळे युवा सेनेचे नेते आणि आदित्य ठाकरे यांचे मावस भाऊ वरुण सरदेसाई वांद्रे पूर्व येथून निवडणूक लढवणार आहे. चांदिवलीतून नसीम खान यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. मागील विधानसभा निवडणुकीत नसीम खान यांचा निसटता पराभव झाला होता.

### लाडकी बहीण योजनेचा प्रतिसाद पाहून विरोधक गडबडलेत

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारच्या योजना जनतेमध्ये प्रचंड लोकप्रिय ठरत आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा प्रतिसाद पाहून विरोधक घाबरले आहेत, असं म्हणणार नाही, पण विरोधक योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहून गडबडले आहेत, असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. गेल्या दोन वर्षांमध्ये महायुती सरकारने जनतेच्या आयुष्यात बदल घडवून आणला आहे. महिला, उद्योग, रोजगार अशा विविध क्षेत्रात सरकारने अविरत मेहनत घेतल्याचे अजित पवार यांनी सांगितले. ते बुधवारी महायुती सरकारच्या संयुक्त पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी महायुती सरकारचे गेल्या दोन वर्षातील कामगिरीचे रिपोर्ट कार्ड सादर करण्यात आले.

### लोखंडवाला परिसरात इमारतीला भीषण आग, आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** एका १४ मजली इमारतीला लागलेल्या आगीत होरपळून ३ नागरिकांचा मृत्यू झाल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. ही घटना मायानगरी मुंबईतील अंधेरीतील लोखंडवाला कॉम्पलेक्स परिसरात असलेल्या रिया पॅलेस या इमारतीत आज सकाळी घडली. चंद्रप्रकाश सोनी, कांता सोनी आणि पेलूबेटा असं मृत्यू झालेल्या तिघांची नावं आहेत. रिया पॅलेस या इमारतीच्या दहाव्या मजल्यावर ही आग लागल्यानं या आगीत होरपळून तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

लोखंडवाला परिसरातील इमारतीला आग : मिळालेल्या माहितीनुसार अंधेरी पश्चिम येथील लोखंडवाला परिसरात रिया पॅलेस ही १४ मजल्याची इमारत आहे. या इमारतीच्या दहाव्या मजल्यावर सकाळी आठ वाजता आग लागली. दहाव्या मजल्यावर एका फ्लॅटमध्ये ही आग लागली. या आगीत घरातील दोन ज्येष्ठ नागरिकांचा आणि एका कर्मचाऱ्यांचा दुर्दैवीरित्या मृत्यू झाला आहे. चंद्रप्रकाश सोनी (वय वर्ष ७४), कांता सोनी (वय वर्ष ७४) आणि पेलूबेटा (वय वर्ष ४२) असं मृत्यूमखी पडलेल्या तिघांचा नावं आहेत. यातील चंद्रप्रकाश सोनी आणि कांता सोनी हे ज्येष्ठ नागरिक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पेलूबेटा हा त्यांचा कर्मचारी असल्याची प्राथमिक माहिती असल्याचंही सूत्रांनी यावेळी सांगितलं. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलानं तत्काळ घटनास्थळी धाव घेत, आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले. आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आलं आहे. दरम्यान, मृत्यूमुखी पडलेल्या तिघांना सुरुवातीला कुपर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. इमारतीला आग लागून तिघांचा मृत्यू झाल्यानं परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### महाविकास आघाडीत जळगाववरून तिढा! शरद पवार आग्रही; चारदा पराभव, तरीही काँग्रेस हट्ट सोडेना

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सातपैकी सहा जागांवर महाविकास आघाडीचे मतैक्य झाले असले तरी जळगाव जामोद मतदारसंघाचा तिढा कायमच आहे. या जागेसाठी शरद पवार आग्रही असून त्यांनी ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडण्याचा आग्रह धरल्याचे वृत्त आहे. दुसरीकडे, मागील सलग चार लढतीत दारुण पराभव होऊनही काँग्रेस ही जागा सोडायला तयार नसल्याचे चित्र आहे.




### उद्धव ठाकरे यांना रुग्णालयातून डिस्चार्ज, आदित्य ठाकरेंनी प्रकृतीबाबत सांगितली 'ही' माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना सोमवारी नियमित चेकअपसाठी मुंबईतील एच एन रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. दरम्यान, उद्धव ठाकरे यांची सर्व वैद्यकीय चाचणी तपासणी व्यवस्थित पार पडल्यानंतर मंगळवारी रात्री उद्धव ठाकरेंना एच एन रिलायन्स रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. आदित्य ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंच्या प्रकृतीबाबत सोशल माध्यमातून माहिती दिली आहे.

उद्धव ठाकरेंवर झाली होती अँजिओप्लास्टी : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर १२ नोव्हेंबर २०२१ रोजी एच एन रिलायन्स रुग्णालयात मानेच्या दुखण्यावरील उपचारासाठी शस्त्रक्रिया करण्यात आली. उद्धव ठाकरे यांच्यावर सर्वाइकल स्पाईनबाबत शस्त्रक्रिया करण्यात आली. दरम्यान, आता नियमित चेकअपसाठी त्यांना सोमवारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. धमन्यामधील ब्लॉकेज तपासण्यासाठी त्यांची वैद्यकीय चाचणी करण्यात आली. तसेच हार्ट ब्लॉकेजशी संबंधित आणि हृदयाशी संबंधित इतर अन्य वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या, असं रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितलं आहे.

## भाजप आमदाराच्या शाळेत मतदान केंद्र, राष्ट्रवादीचा आक्षेप

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात निवडणूकीची घोषणा झाली असून निवडणूक आयोग मतदानाच्या तयारीला लागले आहे. मतदानसाठी राज्यभरातील विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये मतदान केंद्र उभारले जाणार आहेत. मात्र नागपूर जिल्ह्यातील हिंगणा विधानसभा क्षेत्रातील मतदान केंद्रावर आक्षेप नोंदविण्यात आले. हिंगणा मतदारसंघात भाजपचे आमदार समीर मेघे यांच्याद्वारा संचालित शाळेत मतदान केंद्र दिल्यामुळे राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) माजी आमदार विजय घोडमारे व पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंटे यांनी आक्षेप घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली.

काय आहे प्रकरण?

याचिकेनुसार, हिंगणा–वानाडोंगरी येथील शिक्षण संस्थेतील महात्मा गांधी इंग्लिश मीडियम हायस्कूल येथे निवडणूक आयोगातर्फे मतदान केंद्र उपलब्ध करून देण्यात येतात. ही शाळा मेघे ग्रुप ऑफ इंन्स्टिटट्यूशनतर्फे संचालित केली जाते. ही शाळा हिंगणा मतदारसंघात येत असून याच मतदार संघाचे भाजपाचे आमदार समीर मेघे या शिक्षण संस्थेचे सचिव आहे. या शाळेमध्ये मतदान केंद्र क्रमांक २६० ते २६६ असे सात मतदान केंद्र आहेत. यावर याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला. त्या विरोधात माजी आमदार विजय घोडमारे यांनी हिंगणा विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान नोंदणी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. मात्र त्यावर सकारात्मक निर्णय न घेतल्याने त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. याचिकेत जिल्हा निवडणूक अधिकारी व जिल्हाधिकारी, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, केंद्रीय निवडणूक आयोग, उप जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान नोंदणी अधिकारी यांना प्रतिवादी करण्यात आले.

न्यायालयाचा निर्णय काय?

नियमानुसार मतदान केंद्र हे शासकीय शाळा, महाविद्यालय किंवा संस्थेच्या परीसरामध्ये असायला हवे. परंतु, ही सात केंद्र समीर मेघे यांच्या शिक्षण संस्थेमध्ये असल्याचा त्याचा प्रभाव मतदानावर पडू शकतो. मुक्त आणि निष्पक्ष निवडणूकीचे आयोजन करण्यात याची बाधा निर्माण होऊ शकते. त्यामुळे, ही अवैध मतदान केंद्र इतर ठिकाणी स्थानांतरीत करावे, अशी विनंती याचिकेतून करण्यात आली. याचिकाकर्त्याने एकाच शाळेत सात मतदान केंद्रावर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केला. उच्च न्यायालयात याप्रकरणी न्या.नितीन सांबरे आणि न्या.वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. न्यायालयात दोन्ही पक्षांनी जोरदार युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांच्या युक्तिवादानंतर आरोप तथ्यहीन असल्याचे निरीक्षण नोंदवित उच्च न्यायालयाने याचिका निकाली काढली.

## आचारसंहितेदरम्यान बँकांमधील मोठ्या व्यवहारांवर आयकर विभागाची करडी नजर!

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** सध्या राज्यभरात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असताना कालपासून आचारसंहितादेखील लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाद्वारे विशेष खबरदारी घेतली जात असून आयकर विभाग देखील ॲक्शन मोडवर आला आहे. आचारसंहितेदरम्यान आर्थिक संस्थांमध्ये होणाऱ्या रोखीच्या व्यवहारावर आयकर विभागाची करडी नजर असणार आहे. त्यामुळे एखाद्या खात्यात १० लाखांवर जमा झालेली रक्कम व एकाच खात्यातून दोन हजारांवर रक्कम १० पेक्षा जास्त खात्यात जमा करण्यात आली असल्यास चौकशीचा फेरा मागे लागणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आचारसंहिता कालावधीत आर्थिक संस्थांकडून होणाऱ्या सर्व रोख व्यवहारांवर आयकर विभागाद्वारे नजर ठेवण्यात येत असते. त्यामुळे राज्यातील सर्व राष्ट्रीयीकृत, खासगी, जिल्हा बँका व नागरी सहकारी बँका यांनी प्रपत्रात रोज माहिती (एसटीआर, सीटीआर) आयकर विभागासह राज्यस्तरीय बँकिंग समिती (एसएलबीसी) यांना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विभाग व जिल्हास्तरावर सनियंत्रण कक्षदेखील स्थापित करण्यात येणार आहे. जिल्ह्यात मुख्यालय असणाऱ्या सर्व नागरी सहकारी बँकांची (मल्टिस्टेट बँकांसह) बैठक आयोजित करण्यात येणार आहे व अनुषंगाने माहिती एकत्र करण्याची जबाबदारी जिल्हा समितीची राहणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

### कोणते व्यवहार असणार संशयाच्या भोवऱ्यात?

'एसएलबीसी'च्या पत्रानुसार पहिल्या 'अ' नमुन्यात एका खात्यातून एकाच दिवशी झालेले दहा लाखांवर व्यवहार दुसऱ्या 'ब'नमुन्यात एका महिन्यात एका खात्यातून दहा लाखांवर झालेले आर्थिक व्यवहार व तिसऱ्या 'क' नमुन्यात एका खातेदाराद्वारे एका दिवसात १० पेक्षा अधिक व्यक्तींना दोन हजारांवर पाठविण्यात आलेली रक्कम याची माहिती रोज द्यावी लागणार आहे.

## विधानसभा निवडणूक काळात महाराष्ट्रात ७ दिवस ड्राय डे !

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. येत्या २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी करण्यात येणार आहे. राज्यात आचारसंहिता सुद्धा लागू करण्यात आली आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर आता राज्यात राजकीय घडमोडींना प्रचंड वेग आला आहे. अशातच निवडणुकांच्या तारखा जाहीर होताच कोणत्या दिवशी 'ड्राय डे' असेल हे देखील स्पष्ट झालं आहे.

निवडणुकांच्या काळात मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध माध्यमातून मतदारांना लालूच दिले जाते. जेवणावळी, पैसे , दारू वाटून मतदारांना आमिष दिले जाते. याच पद्धतीच्या चुकीच्या गोष्टी होऊ नयेत म्हणून निवडणुकीच्या महत्वाच्या दिवसांमध्ये दारू विक्रीला बंदी केली जाते. राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी मतदारांना



लालूच देण्यासाठी दारूचा वापर करू नये यासाठी निवडणूक आयोगानं मतदानाच्या ४८ तास आधी म्हणजे दोन दिवस आधी ड्राय डे घोषित केला जातो तसा नियमच बनवण्यात आला आहे आणि यामानुसार मतदारांना अमिष म्हणून दारू सेवन आणि वितरण रोखण्यासाठी संपूर्ण राज्यांमध्ये दारूची दुकान बंद ठेवली जातात.

महाराष्ट्रात कोणत्या दिवशी ड्राय डे?

महाराष्ट्रात कोणत्या दिवशी ड्राय डे असणार आहे याची माहिती आता समोर आली आहे. १ नोव्हेंबरला दिवाळीनिमित्त, १२ नोव्हेंबरला कार्तिकी एकादशीनिमित्त तर १५ नोव्हेंबरला गुरुनानक जयंती निमित्त ड्राय डे असणार आहे. तर १८ नोव्हेंबरला संध्याकाळी ५ वाजल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा थंड होतील तेव्हापासून ते २० नोव्हेंबरला मतदान पार पडेपर्यंत राज्यातील दारूचे दुकान बंद राहणार आहेत. २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल असल्यामुळे त्यादिवशी देखील ड्राय डे असणार आहे.

## भारत न्यूझीलंडलाही क्लीन स्वीप देणार ?

बांगलादेशला कसोटी आणि टी २० मालिकेत क्लीन स्वीप दिल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ आता न्यूझीलंडशी दोन हात करण्यास सज्ज झाला आहे. न्युझीलंड संघ भारत दौऱ्यावर आला असून या दौऱ्यात भारत – न्युझीलंड यांच्यात तीन कसोटी सामन्याची मालिका खेळणार होणार असून या मालिकेतील पहिला कसोटी सामना कालपासून म्हणजे १६ तारखेपासून सुरू झाला आहे. भारतासाठी ही खूप महत्वाची मालिका आहे कारण या मालिकेत विजयी मिळवून भारत विश्र्व कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतील आपले स्थान नक्की करणार आहे. या मालिकेत जर भारताने विजय मिळवला तर सलग तीन वर्ष विश्र्व कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळवणारा भारत हा पहिला संघ ठरेल अर्थात भारत ही कसोटी मालिका जिंकणार यात कोणालाही शंका नाही प्रश्र्न आहे तो फक्त भारत न्यूझीलंडला बांगलादेश प्रमाणेच क्लीन स्वीप देणार का ? इतकाच. अर्थात भारताचा सध्याचा फॉर्म पाहता भारत या मालिकेत न्यूझीलंडला क्लीन स्वीप देत ३ – ० ने नमवेल अशीच चिन्ह दिसत आहे. भारत आज विश्र्व चॅम्पियनशिपच्या पदक तालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. भारतीय संघ सध्या तुफान फॉर्मात आहे. भारताचे सर्वच फलंदाज आणि गोलंदाज आज फॉर्मात आहे. भारताची फलंदाजी तर जगातील अव्वल फलंदाजी असून जगातील सर्वात धोकेदायक फलंदाज भारतात आहे. भारताचा कर्णधार आणि सलामीवीर रोहित शर्मा तसेच माजी कर्णधार विराट कोहली हे जगातील सर्वोत्तम फलंदाज समजले जातात यासोबतच भारताकडे यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल हे युवा फलंदाज असून ते त्यांच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये आहे. अतिशय कमी कालावधीत या दोन्ही धडाकेबाज फलंदाजांनी अनेक विक्रम करत खोऱ्याने धावा केल्या आहेत. विकेट किपर ऋषभ पंत हा देखील असाच एक धडाकेबाज फलंदाज भारताकडे आहे. जीवघेण्या अपघातातून सावरलेला ऋषभ पंत हा जगातील सर्वात आक्रमक फलंदाज मानला जातो. आपल्या आक्रमक खेळीने सामना भारताकडे वळवण्याची ताकद त्याच्याकडे आहे. के एल राहुल हा संयमी फलंदाज मधल्या फळीचा कणा आहे. आक्रमक आणि संयमी अशा दोन्ही प्रकारच्या खेळी तो करू शकतो त्यामुळेच ही जगातील सर्वोत्तम फलंदाजांची फळी म्हणून भारताच्या फलंदाजीकडे पाहिले जाते. रविचंद्रन आश्र्विन आणि रवींद्र जडेजा हे भारताचे सर्वोत्तम फिरकीपटू आता केवळ फिरकीपटू नसून ते आता अष्टपैलू बनले आहेत. हे दोघे केवळ बॉलनेच नव्हे तर बॅटनेही कमाल करू शकतात हे आपण बांगलादेश विरुद्धच्या मालिकेत पाहिले आहे. त्यांच्या गोलंदाजीवर तर न बोललेलेच बरे. कसोटी मधील सर्वोत्तम फिरकी जोडी अशी त्यांची ओळख असून दोघानी मिळून ८५० च्या वर बळी घेतले आहेत. जसप्रीत बुमरा हा जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज भारताकडे आहे. हा गोलंदाज भल्या भल्या फलंदाजांची दांडी गुल करण्यात माहीर आहे. त्याला मोहंमद सिराज आणि नवोदित आकाश दीप यांची साथ मिळते त्यामुळे भारताचा हा संघ जगातील सर्वोत्तम संघ मानला जात आहे. अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यासारखे गोलंदाज पॅव्हेलियनमध्ये बसतात यावरून भारतीय संघात किती ताकद दिसून येते. एकीकडे भारतीय संघ भक्कम दिसत असताना न्युझीलंड संघाने मात्र त्यांचा फॉर्म गमावला आहे. श्रीलंकेने त्यांचा नुकताच पराभव केला आहे. गेल्या काही दिवसात या संघाने उल्लेखनीय असा खेळ केलेला नाही. भारतातही या संघाची कामगिरी निराशाजनक आहे. भारतात विजय मिळवून या संघाला कैक वर्ष उलटली आहेत. मागील अनेक वर्षात हा संघ भारतात विजय मिळवू शकला नाही त्यामुळे भारतीय संघ न्यूझीलंडला देखील ३ – ० असा क्लीन स्वीप देऊन विश्र्व कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत प्रवेश निश्र्चित करेल यात शंका नाही. भारतीय संघ घरच्या मैदानावर दादा संघ आहे . घरच्या मैदानावर मागील १८ मालिका भारताने जिंकल्या आहेत यावरून भारताच्या ताकदीची कल्पना आहे. न्युझीलंड विरुद्ध विजय मिळवून भारतीय संघ ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडला इशारा देऊ शकतो कारण या मालिकेनंतर भारताला ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या तुल्यबळ प्रतिस्पर्धी संघाशी लढायचे आहे शिवाय विश्र्व कसोटी चॅम्पियनशीपच्या अंतिम फेरीतही विजय मिळवायचा आहे त्याची पायाभरणी भारत या मालिकेतून करेल यात शंका नाही. भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!

# दिग्रस विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी

## मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न– निवडणूक निर्णय अधिकारी

**दैनिक आपला विदर्भ**

**यवतमाळ** : दिग्रस ,दारव्हा, नेर विधानसभा ७९ मतदार संघाच्या निवडणूकीचा बिगुल वाजला असुन, त्या अनुषंगाने शासनाची निवडणुक कामा करता वेग आला आहे . यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी विजय सुर्यवंशी यांनी पत्रकाराशी बोलताना म्हणाले की, या निवडणुकीत एकूण मतदार३४०९४८( तीन लाख चाळीस हजार नऊशे अठ्ठेचाळीस) असुन त्यामध्ये पुरुष१७६७८८, महिला १६७१४७ तर ट्रान्सजेंडर १३ आहेत. यामध्ये ३ तालुक्यात पोलिंग स्टेशन ३९६ असून, या निवडणुक कामाकरिता ३५०० मनुष्य बळ लागणार आहे. या करीता ३६ झोन असून ४ अतिरिक्त झोन आहे . या करिता निवडणुक निर्णय अधिकारी, दारव्हा दिग्रस ,नेर येथील तहसिलदार मुख्याधिकारी यांची निवडणुक कार्याच्या विविध कार्यासाठी नोडल अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली आहे. या निवडणुक कार्याकरता



विविध आस्थापनेची व्यवस्था केली असुन, त्यामध्ये फ्लाईंगी स्काड, एकल खिडकी केंद्राची व्यवस्था केली आहे.

तसेच मतदान जनजागृती करीता विशेष योजना तसेच सर्वाच्या सहाकार्याने मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले आहे. पत्रकार परिषद घेतांना निवडणुक निर्णय अधिकारी विजय सुर्यवंशी, तहसिलदार रवी काळे, मुख्याधिकारी विठ्ठल केदारे व पत्रकार उपस्थित होते.

# नेर पोलिस निरीक्षक राहुल आठवले यांचे जि,प. उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## विध्यार्थ्यांनी शारीरिक सुदृढता आणि अभ्यासात सातत्य ठेऊन भविष्याचा वेध घ्यावा: राहुल आठवले

**दैनिक आपला विदर्भ**

**यवतमाळ:** नेर तालुक्यातील मालखेड बुद्रुक येथील जिल्हा परिषद माध्यमिक मराठी शाळा आणि जिल्हा परिषद उर्दु शाळेतील विद्यार्थ्यांना नेर पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांनी मार्गदर्शन केले पोलिस निरीक्षक राहुल आठवले यांनी यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करुन आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहित केले तर सोबतच विध्यार्थी दशेत शारीरिक सृदृढता ठेवण्यासाठी व्यायाम आणि पोषक आहार महत्त्वाचा आहे आणि यामुळे आपण आपले व आपल्या देशाचे भवितव्य संरक्षण करुन येणारी युवा पिढीला निर्भय करु शकतो तर आधुनिक ऐ आय क्रांतीकारी टेक्नॉलॉजी मुळे येणारा काळ हा तंत्रज्ञानाने विकसित उज्वल आणि समृद्ध राहील या



करीता विध्यार्थी आणि विद्यार्थीनींनी अभ्यासात सातत्य कायम ठेवून सम्यक मानसिक संतुलन कायम ठेवण्याचा पोलिस निरीक्षक राहुल आठवले यांनी कानमंत्र दिला यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी , विद्यार्थीनी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मालखेड येथील गावकरी उपस्थित होते.

## नवी मुंबईत भीषण अपघात, शरीराचे दोन तुकडे, कमरेपासून खालचा भाग झाला वेगळा

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईत पाम बीच मार्गावर भीषण अपघात झाला असून यात एकाचा मृत्यू झाला आहे. अपघात इतका भीषण होता की अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या शरीराचे दोन तुकडे झाले आहेत. दरम्यान, हा अपघात कसा झाला हे समजू शकलेलं नाही. अपघातात कोणत्या वाहनाने धडक दिली आणि चिरडलं हे समोर आलेलं नाही. पोलिसात या अपघाताची नोंद झाली असून अधिक तपास केला जात आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, नवी मुंबईत पाम बीच मार्गावर पहाटे चार वाजता भीषण अपघात झाला. या अपघातातील मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या शरीराचे दोन तुकडे झाले आहेत. कमरेपासून खालचा भाग शरीरापासून वेगळा झालाय. रस्त्यात रक्तामांसाचा चिखल झाला होता. घटनास्थळावरचे दृश्य हादरवून टाकणारे होते. अपघातातील मृत व्यक्तिची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे.

## विश्वासू मोलकरणीचा प्रताप; ८ वर्षापासून कणिक मळताना मिसळायची लघवी

गझियाबाद : उत्तर प्रदेशच्या गाझियाबाद येथे एक धक्कादायक व किळसवाणी घटना उघडकीस आली आहे. एका घरात काम करणाऱ्या मदतनीस महिलेने जेवण बनवताना असं काही केलं की संपूर्ण कुटुंब आजारी पडलं. आठ वर्षापासून एक महिला या घरात जेवण बनवण्याचे काम करत होती. ती सर्व कुटुंबासाठी जेवण बनवत होती. मात्र जेवण बनवत असताना ती त्यात लघवी मिसळायची. या किळसवाण्या व अंगावर काटा येणाऱ्या घटनेचा खुलासा तेव्हा झाला जेव्हा घरमालकाने स्वयंपाकघरात सीसीटिव्ही लावले. महिलेच्या या कृत्यामुळं हळूहळू घरातील सर्व सदस्य आजारी पडू लागले होते. गाझियाबाद येथील एका सोसायटीत राहणाऱ्या रिअल इस्टेट व्यापारी आणि त्याचे कुटुंब गेल्या महिन्याभरापासून गंभीर आजाराने त्रस्त होते. कुटुंबातील लोक पोटदुखी आणि लिव्हरच्या आजाराने ग्रस्त होते. सुरुवातीला साधारण इन्फेक्सन असू शकेल असं समजून डॉक्टरांकडून उपचार घेतले. मात्र त्यात काहीच सुधारणा झाली नाही. जेव्हा प्रकृती अधिक खालावत गेली तेव्हा जेवणातच काहीतरी गडबड असावी, अशी शंका त्यांना आली. त्यानंतर त्यांनी स्वयंपाकघर आणि अन्य ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरा लावले. जेणेकरुन जेवणाच्या तयारीवर लक्ष ठेवण्यात येईल.

# गुणरत्न सदावर्ते यांची केली बिग बॉससह चाहत्यांनी आठवण, घरातील १० स्पर्धक झाले नॉमिनेट...

**मुंबई/प्रतिनिधी :** 'बिग बॉस १८' शो १९ स्पर्धकांसह ६ ऑक्टोबरपासून कलर्स टीव्ही आणि जिओ सिनेमावर सुरू झाला. हा शो आता प्रेक्षकांमध्ये धुमाकूळ घालत आहे. 'बिग बॉस १८' प्रसारित होऊन एका आठवड्याहून अधिक काळ झाला आहे. आता बिग बॉसच्या घरात १७ स्पर्धक उरले आहेत. दरम्यान, मंगळवारी, निर्मात्यांनी दुसऱ्या आठवड्याच्या एलिमिनेशनसाठी एक टास्क सेट केला होता. यामध्ये १७ पैकी १० स्पर्धकांना नॉमिनेट केले गेले होते. गेल्या आठवड्यात सलमान खाननं १९वा स्पर्धक गधराज (गाढव) याला काढून टाकण्याची घोषणा केली होती. पेटा इंडियानं गधराजच्या संदर्भात निर्मात्यांविरोधात नोटीस जारी केली. यानंतर हा निर्णय घेण्यात आला होता.

यानंतर गुणरत्न सदावर्ते यांना देखील एका केस संदर्भात 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडावे लागले होते. आता ते या शोमध्ये दिसत नसल्यानं अनेकजण त्यांची आठवण करताना दिसत आहेत. 'बिग बॉस १८'च्या फॅनपेज 'बिग बॉस तक'नं एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिलंय. 'डॉ. गुणरत्न सदावर्ते उर्फ डंकू काका तुम्हाला मिस करत आहे. 'बिग बॉस १८'मध्ये लवकरच परत या.' आता या पोस्टवर अनेकजण आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. यावर एका चाहत्यानं लिहिलं, 'आम्हाला तुमची आठवण येत आहे.' दुसऱ्या एकानं लिहिलं, 'घरात तो एकमेव मनोरंजक पात्र होतं.' आणखी एकानं लिहिलं, 'हा व्यक्त खूप चांगला आहे, खूप मनोरंजन करतो.'

आज १६ ऑक्टोबर रोजी एक प्रोमो रिलीज केला गेला आहे, यामध्ये अविनाश मिश्रा आणि चुम दरंग भांडताना दिसत आहेत. दरम्यान, चुम अविनाशसाठी अपशब्द वापरते. यानंतर अविनाश आणि चुममधील भांडण वाढून हाणामारीपर्यंत पोहोचते. दरम्यान, घरातील सदस्य दोन्ही स्पर्धकांना शांत करण्याचा प्रयत्न करतात. मात्र हे प्रकरण वाढत पाहून 'बिग बॉस' अविनाशला घरामधून बाहेर काढण्याची घोषणा करते. आता अविनाशला घरातून बाहेर काढले जाईल की यात त्यांची नवीन युक्ती असेल, हे पाहणं मनोरंजक असणार आहे.

## मेहकर शहरातील विविध प्रभागांमधे संरक्षण भिंती, सभामंडप, रस्ते बांधकामांसाठी

# आमदार संजय रायमूलकर यांच्या प्रयत्नातून १० कोटी रुपये मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर शहरातील विविध प्रभागांमध्ये संरक्षण भिंत, सभामंडप बांधकाम, सिमेंट व डांबरीकरणाचे रस्ते अशा विविध कामांसाठी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून नियोजन विभागाने दहा कोटी रुपयांच्या विकास कामांना मंजुरी दिली असून या संदर्भातील निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे.

सविस्तर माहिती अशी की, १४ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्य शासनाच्या नियोजन विभागाच्या सहसचिव चारुशीला चौधरी यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आलेल्या शासकीय परिपत्रकात या सर्व कामांना मंजुरी देण्यात आली असून निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे. आमदार संजय रायमुलकर यांनी या विकास कामांचे प्रस्ताव फार पूर्वी सादर केले होते. अथक पाठपुराव्यानंतर या २१ कामांना शासनाची मंजुरी मिळाली आहे.



नागरिकांच्या मागणीनुसार ही विकास कामे मंजूर करण्यात आली असून त्यात जिजाऊ नगर येथील नगर परिषदेच्या खुल्या जागेत संरक्षण भिंतीचे बांधकाम व सौंदर्यीकरण कामासाठी तीस लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. सिंधुताई जाधव महाविद्यालया जवळील खुल्या जागेत भाजीपाला विक्री संकुल बांधकाम एक कोटी रुपये, प्रताप नगर येथील जुन्या राम मंदिराजवळ सभामंडपाचे बांधकाम आणि सौंदर्यीकरण करणे एक कोटी रुपये, रामनगर भागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण व सिमेंटीकरण करणे एक कोटी रुपये, रामनगर भागातील प्रदीप जोशी यांच्या घरासमोरील खुल्या जागेला संरक्षक भिंत बांधकाम करणे ७५ लाख रुपये, गजानन नगर येथे नितीन बोडखे यांच्या घराजवळील खुल्या जागेला संरक्षण भिंत व सौंदर्यीकरण, बालाजी नगर येथे नगरपरिषदेच्या खुल्या जागेत संरक्षण भिंत व सौंदर्यकरण करणे, डोणगाव रोडवरील विठ्ठल अग्रवाल यांच्या घराजवळील सरकारी खुल्या जागेवर संरक्षण भिंत उभारणी व सौंदर्यकरण, गवळीपुरा भागात शादी खाना बांधकाम, शिक्षक कॉलनी येथे तनशीराम मानघाले यांच्या घराजवळील सरकारी खुल्या जागेत विविध उपयोगी सभागृहाचे बांधकाम करणे, सेठी लेआउट येथील राम बुगदाणे यांच्या घरासमोरील सिमेंट रस्ता बांधकाम, शिक्षक कॉलनी भागातील सुदेश लोढे यांचे घर ते गजानन धोंडगे घर रस्त्याचे सिमेंटरीकरण करणे ही सर्व प्रत्येकी ५० लाख रुपये खर्चाची कामे मंजूर करण्यात आली आहेत.

चनखोरे कॉलनी भागातील सुरेश मावळ यांच्या घराजवळील सरकारी जागेत सभामंडप व संरक्षण भिंत बांधकाम ३५ लाख रुपये, संतोषी माता मंदिर जवळील खुल्या जागेवर सभामंडप बांधकाम व जिम विकसित करण्यास ३० लाख रुपये, सद्गुरुनगर येथे गजानन महाराज मंदिराजवळील जागेत संरक्षण भिंत उभी करणे, गोपालकृष्ण मंदिर येथे महानुभाव समाजासाठी सभामंडप बांधकाम, रहाटे कॉलनी मध्ये जैन स्नातक समाज सभा मंडप बांधकाम, कुंजविहार कॉलनी येथे संदीप मेटांगळे यांच्या घराजवळ संरक्षण भिंतीचे बांधकाम व सौंदर्यीकरण करणे ही प्रत्येकी २५ लाख रुपये खर्चाची कामे करण्यात येणार आहेत. जिजाऊ नगर येथे खुल्या जागेवर संरक्षण भिंतीचे बांधकाम आणि सौंदर्यीकरण करणे ३०लाख रुपये , शाहूनगर येथे सभामंडप बांधकाम करणे २० लाख रुपये, शहरातील प्रमुख चौकांमध्ये सी सी टी व्ही बसविणे दहा लाख रुपये. अशा एकूण दहा कोटी रुपयांच्या बांधकाम व इतर कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था परीक्षत्रात विशिष्ट नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या विशेष योजनेतून या सर्व कामांना मंजुरी देण्यात आली आहे. शहराच्या विविध विभागातील या कामांना मंजुरी मिळाल्यामुळे नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे व त्यांनी आमदार संजय रायमुलकर यांचे आभार मानले आहेत, अशी माहिती आमदार रायमुलकर यांचे स्वीय सहाय्यक रुपेश गणातरा यांनी दिली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पंढरपूर विधानसभा मतदार संघात ३ लाख ७१ हजार २९० मतदार

## निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** निवडणूक आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. पंढरपूर विधानसभा मतदार संघात १ लाख ९० हजार १३५ पुरुष मतदार तर १ लाख ८० हजार ५७७ स्त्री मतदार व इतर मतदार २६ असे एकूण ३ लाख ७१ हजार २९० मतदार आहेत. तसेच ५५२ सैनिक मतदार आहेत. विधानसभा मतदार संघामध्ये एकूण ३५७ मतदान केंद्रे आहेत. प्रत्येक मतदान केंद्रासाठी १ याप्रमाणे ३५७ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नेमण्यात आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी ३६, भरारी पथक १८, स्थिर पथक १६, व्हिडीओ पहाणी पथक १४, व्हिडीओ सर्वेक्षण पथक २ तसेच समन्वय अधिकारी म्हणून ४० नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. क्षेत्रीय अधिकारी यांच्या नेमून दिलेल्या गावामध्ये संयुक्त भेटी झालेल्या असून त्याबाबतचे अहवाल कार्यालयास प्राप्त झाले आहेत. तसेच यापूर्वी सर्व मतदान केंद्रांची सुविधा बाबतची तपासणी पर्यवेक्षक व मंडल अधिकारी यांच्याकडून करून घेण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया निर्भयपणे पार पडावी म्हणून तक्रार निवारण केंद्र, सुविधा ॲप, टपाली मतदान सुविधा, भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडीओ पहाणी पथके, व्हिडीओ सर्वेक्षण पथक तैनात करण्यात येणार आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी ८५ वर्षावरील मतदार संख्या ही ५३३४ आहे. तर अपंग मतदार(पी.डब्ल्युडी) २७१० आहे. ज्यांना मतदान केंद्रावर मतदानासाठी येणे शक्य नाही, अशा मतदारांना होम वोटिंग सुविधा देण्यात येणार आहे. त्यासाठी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. पंढरपूर मतदार संघात एकही केंद्र संवेदनशील नाही. तर ५० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे.

मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपूर येथे निवडणूक नियंत्रण व समन्वय कक्ष व कंट्रोल रुम तयार करण्यात आली आहे. याव्दारे सर्व पथकांवर नजर ठेवण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आचारसंहितेबाबत काही तक्रारी असल्यास सी व्हिजील ॲप वापरण्यात येत आहे. तर उमेदवारांना लागणाऱ्या सर्व परवानग्या घेण्यासाठी एक खिडकी योजना व सुविधा प्रणालीव्दारे अर्ज



करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नागरिकांनी मतदार नोंदणी, मतदार यादीत नाव तपासणी यासाठी व्होटर हेल्पिंग पचा करु शकता.

भारत निवडणूक आयोग यांनी जाहीर केल्याप्रमाणे पंढरपूर विधानसभा मतदार संघासाठी आदर्श आचार संहिता दि. १५ ऑक्टो. रोजी पूर्वलक्षी प्रभावाने लागू झालेली आहे. दि. २२ ऑक्टो. रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार अहे. नामनिर्देशन २३ ते २९ ऑक्टो. पर्यंत, अर्जाची छाननी ३० ऑक्टो.पर्यंत, उमेदवारी अर्ज माघार घेण्याची अंतिम तारीख ४ नोव्हेंबर,दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. मतमोजणी दि. २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तर निवडणूक प्रक्रिया दि. २५ नोव्हेंबर पर्यंत पुर्ण करण्यात येणार आहे. आदर्श आचार संहिता जाहीर झाल्यापासून पंढरपूर विधानसभा मतदार संघातील सर्व राजकीय पक्षांचे भित्तीपत्रके, घोषवाक्ये, पोस्टर्स, बॅनर्स, झेंडे तातडीने यंत्रणे मार्फत हटविण्याचे काम चालू आहे.

दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रावर येण्यासाठी व्हिलचेअर, रॅम्पची सुविधा, उमेदवारांसाठी अर्ज भरणे सोपे जावे म्हणून सुविधा ॲपची मदत घेता येणार आहे. ५० टक्के मतदान केंद्रांवर सीसीटिव्ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. उमेदवारांचा निवडणूक खर्च तीन वेळा तपासला जाणार आहे. सोशल मिडीयाचा वापर उमेदवार व मतदारांनी जपून वापर करावा असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी इथापे यांनी यावेळी केले.

## संक्षिप्त...

### महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणणे ही आमची जबाबदारी - चित्रा वाघ



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणणे ही आमची जबाबदारी आहे, आणि त्यासाठी आम्ही प्रचंड मेहनत घेऊ आणि महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणू अशी ग्वाही भाजप आमदार चित्रा वाघ यांनी दिली. त्या रत्नागिरी येथे प्रसार माध्यमांची बोलत होत्या. यावेळी त्यापुढे म्हणाल्या की,महायुती सरकारने सर्वसामान्य, गोरगरिबांचे हित डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेतलेले आहेत. बहिण योजनेमुळे राज्यातल्या महिला खुश आहेत. दीड हजारांनी संसार नाही चालणार पण ते तिच्या हक्काचे पैसे आहेत. छोटे-मोठे खर्च या मिळालेल्या दीड हजार रुपयामधून भागणार आहेत. महिला त्यांचे अनुभव सांगत आहेत, महिला वर्गाला लाडकी बहीण योजनेमुळे चांगला दिलासा मिळाला आहे. रत्नागिरीत भाजपने झोकून काम केले आणि उदय सामंत यांना निवडून आणले,त्यांचा विजय झाला. २०२४ ला देखील पक्षाने सांगितल्या प्रमाणे काम करत आहोत. बाळासाहेब माझ्या बाजूला बसले आहेत, प्रत्येकाला लढावे अशी इच्छा असते. कुठल्या बहीणीला वाटणार नाही की भावाला तिकीट मिळू नये. महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणणे ही आमची जबाबदारी आहे. आणि ही जबाबदारी आम्ही चोखपणे पार पाडून महायुतीचा उमेदवार निवडून अशी ग्वाही भाजप आमदार चित्रा वाघ यांनी दिली.

### नारळी बाग येथील उभ्या बसला लागली भीषण आग, आगीत बस जळून खाक



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर शहरातील नारळीभाग येथे सवेरा ट्रॅव्हल्स पार्किंग आहे या ठिकाणी उभे असलेल्या एका बसला अचानक आग लागली यागी मध्ये बस संपूर्णपणे जळून खाक झाले. ही घटना मंगळवार दिनांक १५ रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास घडली. सुदैवाने यामध्ये जीवित हानी टळली. याप्रकरणी स्थानी दिलेल्या माहितीनुसार छत्रपती संभाजीराजे शहरातील नारळी विभाग येथे सवेरा ट्रॅव्हल्स या बस कंपनीची पार्किंग आहे. या पार्किंग मध्ये नियमित बस उभे असतात. दरम्यान मंगळवार दिनांक १५ रोजी सायंकाळी ९ वाजेच्या सुमारास पार्किंग मध्ये उभे असलेली बस ने अचानक पेट घेतला. यामध्ये आगीने रौद्ररूप धारण केले. यात संपूर्ण बस जळून खाक झाली. याच पार्किंग मध्ये ऑइलचा देखील टॅक्टर असल्यामुळे या ठिकाणी अनुचित प्रकार घडण्याची शक्यता वर्तवली जात होती मात्र सुदैवाने या ठिकाणी अनुचित प्रकार घडला नाही कुठलीही जीवित हानी झाली नाही.ही आग नेमकी कशामुळे लागली याचं कारण अद्याप समजू शकले नाही.

### वयाच्या २५ व्या वर्षी धर्म बदलणारा भारतीय क्रिकेटपटू, त्याने आपल्या संघ बनवले चॅम्पियन, सचिन तेंडुलकरने दिली ट्रॉफी

नवी दिल्ली : १० षटकांच्या फॉरमॅटमध्ये खेळल्या जाणाऱ्या नॅशनल क्रिकेट लीग या अमेरिकन स्पर्धेचा विजेता निश्चित झाला आहे. शिकागोने अंतिम सामन्यात अटलांटा किंग्जचा पराभव करून विजेतेपद पटकावले. वयाच्या २५ व्या वर्षी धर्म बदलणाऱ्या या भारतीय फलंदाजाचा शिकागोच्या विजयात मोठा वाटा आहे. त्या भारतीय क्रिकेटपटूच्या नेतृत्वाखाली शिकागोने स्पर्धेचे जेतेपद पटकावले. अंतिम सामना जिंकल्यानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने विजेत्या संघाच्या कर्णधाराला ट्रॉफी दिली.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की वयाच्या २५ व्या वर्षी धर्म बदलणारा तो भारतीय क्रिकेटर कोण आहे? त्या भारतीय क्रिकेटपटूचे नाव आहे रॉबिन उथप्पा, ज्याच्या नेतृत्वाखाली शिकागो संघाने राष्ट्रीय क्रिकेट लीग ऊ१० च्या पहिल्या सत्राचे विजेतेपद पटकावले. रॉबिन उथप्पा सुरुवातीला हिंदू होता, पण नंतर वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी धर्म बदलला आणि ख्रिश्चन बनला. भारतीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या उथप्पाने शिकागोला एनसीएलचे विजेतेपद मिळवून देण्यात फलंदाजी आणि कर्णधारपद दोन्हीसह योगदान दिले आहे. अंतिम सामन्यात शिकागो सीसी संघाने प्रथम फलंदाजी करत १० षटकात ४ गडी गमावून १६० धावा केल्या. सलामीला आलेल्या कर्णधार रॉबिन उथप्पाने संघासाठी १५ चेंडूत ३५ धावा केल्या, ज्यात ३ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. त्याच्याशिवाय लिओनार्डो ज्युलियनने २२ चेंडूत ६१ धावांची खेळी केली.

अटलांटा किंग्जसमोर आता विजयासाठी १६२ धावांचे लक्ष्य होते, मात्र त्यांना ११७ धावांपेक्षा जास्त धावा करता आल्या नाहीत. अटलांटातर्फे टॉम ब्रूसने २१ चेंडूत नाबाद ६१ धावा केल्या, पण संघाला विजय मिळवून देण्याचा त्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला आणि त्यामुळे उथप्पाच्या संघाला मैदान गमवावे लागले. एनसीएलच्या अंतिम सामन्यासाठी अमेरिकेत पोहोचलेल्या सचिन तेंडुलकरने विजयानंतर शिकागो सीसीचा कर्णधार रॉबिन उथप्पाकडे विजयाची ट्रॉफी दिली.

## धक्कादायक! रात्रीच्या अंधारात धावत्या ट्रेनच्या खिडकीतून पडली मुलगी; वडिलांनी डोळे उघडेपर्यंत...

भोपाळ : रेल्वे प्रवासादरम्यान प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी रेल्वे प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सातत्यानं प्रयत्न करत असते. प्रवाशांपुढील अडचणींवर तोडगा काढत या यंत्रणा त्यांना प्रवासाचा सुखकर अनुभव देताना दिसतात. अशाच एका अतिशय गंभीर प्रसंगामध्ये रेल्वे पोलीस आणि इतर यंत्रणांनी तातडीनं पावलं उचलत एका लहान मुलीचे प्राण वाचवले. सोशल मीडियावरील व्हिडीओमुळं घडला प्रकार सम ोर आला.

मध्य प्रदेशाच्या ललिपूर येथील एक कुटुंब आपल्या ८ वर्षाच्या मुलीला घेऊन रेल्वेनं वृंदावनला जात होतं. रात्रीच्या वेळी हवा खेळती रहावी यासाठी डब्याची आपत्कालीन खिडकी उघडी ठेवली होती. त्याच खिडकीतून धावत्या ट्रेनमधून ८ वर्षाची मुलगी पडली. वडिलांनी डोळे उघडेपर्यंत ट्रेन १० ते १२ किलोमीटर पुढे सरकली होती. घटनेची माहिती होताच एकच खळबळ माजली. ज्यानंतर तातडीनं ट्रेन थांबवून जीआरपी आणि आरपीएफला घटनेची माहिती देण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच मुलीचा शोध घेण्यासाठी १६ किमीचा परिसर जीआरपी, आरपीएफ आणि रेल्वेच्या टीमम ध्ये विभागून टार्गेट करण्यात आला. शोध मोहिमेतील सर्व पथकांच्या मेहनतीला अखेर फळ मिळालं. मुलगी रुळाच्या बाजूला जखमी अवस्थेत आढळून आली. तितक्यातच तिथं एक मालगाडी येताना दिसली, रेल्वे अधिकाऱ्यांच्या मदतीने मुलीला तात्काळ रुग्णालयात नेण्यासाठी मालगाडी थांबवण्यात आली. ललितपूरला पोहोचल्यानंतर म ुलीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

## सावली फाउंडेशन व नवनिर्माण कन्या शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. एपीजे अब्दुल कलाम जयंती संपन्न





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिड :** दिनांक १५/१०/२०२४ वार मंगळवार रोजी भारताचे पूर्व राष्ट्रपती, मिसाईल व सॅटेलाईट प्रक्षेपण तंत्रज्ञान विकास कार्यामध्ये महत्वाचा वाटा असणारे मिसाईल मॅन भारतीय शास्त्रज्ञ डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून देशभर साजरी करण्यात येते त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून नवनिर्माण कन्या शाळा पाटोदा या ठिकाणी वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सदरील कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांकडून विविध पुस्तकांचे वाचन करून कलामांना सलाम करण्यात करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका एस पी भोपळे मॅडम व सावली फाउंडेशनचे प्रकल्प संचालक बाबासाहेब सरकटे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

उपस्थित जे ए मोरे सर यांनी विद्यार्थ्यांना डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवन प्रवासावर आधारित माहिती दिली व विद्यार्थ्यांना अब्दुल कलामांच्या विचाराने आजचा विद्यार्थी या विषयावर संबोधित केले.

यावेळी प्रवीण भोसले सर,सोंडगे मॅडम, भोसले मॅडम, लहुळकर सर, बोराटे सर, मोरे मॅडम, धायतडक सर व सावली फाउंडेशनचे उमेश खरात यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## अतिक्रमण धारकांना प्रॉपर्टी कार्ड देण्याची गुंजकर यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** शहरातील सर्वे नंबर ४४१ मधील रामनगर, गौसपुरा, इंदिरानगर मधील अतिक्रमण धारकांच्या जागेची मोजणी करून त्यांना नियमकुल करून प्रॉपर्टी कार्ड देण्यात यावे या मागणीसाठी मी वडार महाराष्ट्राचा संघटनेच्या वाशिम जिल्हा संपर्क प्रमुख भारत गुंजकर हे सातत्याने पाठपुरावा करून नगरपरिषद, तहसील, महसूल विभागाला निवेदन देऊन मागणी करत आहेत. यादरम्यान ऑगस्ट महिन्यात भारत गुंजकर यांनी या संदर्भात उपोषणही केले होते. या उपोषणाला अनेक मान्यवरांनी भेट दिली होत्या यामध्ये आमदार आणि झनक यांचाही समावेश आहे.सदर जागेची मोजणी करून त्यांना नियमकुल करून प्रॉपर्टी कार्ड देण्यात यावी असे आश्र्वासन




नगरपरिषद व तहसील विभागाने देत भारत गुंजकर यांचे उपोषण सोडले होते. सदर प्रकरण हे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाला निवेदनाद्वारे कळवण्यात आले होते. भारत गुंजकर यांनी सदर निवेदन देऊन जिल्हाधिकारी यांना लक्ष घालण्याची मागणी केली होती. या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी नगरपरिषद ला पत्रही दिले होते व सदर जागेची मोजणी करण्याचे पत्रात नमूद करण्यात आले होते. या अनुषंगाने दिनांक १० ऑक्टोबर रोजी गुंजकर यांनी सदर पत्राचा संदर्भ घेत मुख्याधिकारी सतीश शेवदा यांच्याकडे निवेदनाद्वारे पुन्हा एकदा मागणी करत सदर क्षेत्राची मोजणी करून अतिक्रमण धारकांना प्रॉपर्टी करोड कार्ड देण्यात यावे अशी मागणी निवेदनात केली आहे. रिसोड मालेगाव विधानसभेचे आमदार अमित झनक यांनी मुख्याधिकारी यांना आपल्या पत्राद्वारे सदर प्रकरण संबंधित लक्ष घालण्याची मागणी केली होती.आमदार यांच्या पत्रानुसार भारत गुंजकर यांनी उपोषण केले होते, सर्वे नंबर ४४१ रामनगर,गौसपुरा, इंदिरानगर मधील अतिक्रमण धारकांच्या जागेची आपल्याकडून मोजणी करून त्यांना ते नियमाकुल करून देण्याचे आश्र्वासन देण्यात आले होते. सदर प्रकरणात जिल्हाधिकारी यांचे पत्र नप ला प्राप्त झाले आहे तरी या पत्रानुसार कारवाई करावी अशी असे आमदार अमित जनक यांच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## 'स्किल ऑन व्हील' या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

### उत्कर्ष फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम : विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** उत्कर्ष फाउंडेशनच्या वतीने 'स्किल ऑन व्हील' या उपक्रमाच्या माध्यमातून दि.१६ ऑक्टोबर रोजी, जानेफळ येथील सरस्वती महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांना कौशल्य विकास शिक्षणाविषयी मार्गदर्शन करण्यात आले.







ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्य विकास शिक्षणाविषयी माहिती व्हावी,त्यांच्यातील कौशल्य विकसित व्हावे, यासाठी उत्कर्ष फाउंडेशन च्या वतीने सरस्वती महाविद्यालय येथे आजूबाजूच्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकास शिक्षणाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी स्किल ऑन व्हील या उपक्रमाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला किर्ती वानखेडे, संस्थेच्या संचालिका किरण चांदणे, अर्चना मिसाळ, प्राचार्य प्रा.डॉ.रामदास धामोडकर, उपप्राचार्य गजानन जाधव, मुख्यध्यापिका मिनल जोहरे,प्राचार्य मापारी, नागेश घायाळ, अंकुश वानखेडे, आदींची उपस्थिती होती. तर किमान कौशल्य विकास शिक्षणाच्या माध्यमातून होतकरू तरुण विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. सरस्वती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून, या संधीचा फायदा घेतला. निश्र्चितच भविष्यात त्यांना याचा फायदा होणार आहे . या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या शिक्षक मंडळी ने सहकार्य केले.

## विविध वृत्त...

### वंचितकडून तिसरी यादी जाहीर, धुळ्यातून माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाट यांना उमेदवारी

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याआधी प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने आपल्या उमेदवारांच्या दोन याद्या जाहीर केल्या होत्या.



यानंतर आज वंचित बहुजन आघाडीने आपली तिसरी यादी जाहीर केली आहे. यामधून त्यांनी धुळे जिल्ह्यातील धुळे शहर विधानसभा मतदारसंघांमधून माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाट यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये धुळे लोकसभा लोकसभा मतदारसंघांमधून माझी आयपीएस अधिकारी अब्दुल रहमान यांना उमेदवारी जाहीर झाली होती मात्र काही कारणास्तव त्यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यात आला होता. यामुळे वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये काही प्रमाणात नाराजी असल्याचे चित्र बघायला मिळाले. मात्र पुन्हा एकदा आता विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी गेल्या वर्षभरापासून कंबर कसली होती आणि आज वंचित बहुजन आघाडी कडून धुळे शहर विधानसभा मतदारसंघासाठी अधिकृत उमेदवार म्हणून माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांचे नाव जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी एकच जल्लोष केला.

### शिवाजी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा





दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,रिसोड येथे डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याच्या उद्देशाने शासनाच्या वतीने त्यांची जयंती ही वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्राचार्य संजय देशमुख यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक, जेष्ठ प्राध्यापक अरुण लिमजे यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनीही डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य संजय देशमुख यांनी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांनी जीवनात विशिष्ट ध्येय घेऊन मार्गक्रमित होण्याचे आवाहन केले व डॉक्टर कलामांसारखा जीवनाचा आदर्श घ्यावा. कोणतीही गोष्ट मिळविण्यासाठी जीवनामध्ये प्रयत्नाची पराकाष्ठा केल्याशिवाय तरणोपाय नाही आणि संकटावर मात केल्याशिवाय जीवनाला आयाम मिळत नाही असे सांगितले. शाळेचे ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक यांनी विद्यार्थ्यांना विविध बहुपयोगी पुस्तकांची माहिती दिली व विद्यार्थ्यांनी असंख्य पुस्तकाचे वाचन करावे असे आवाहन केले. तसेच शाळेतील काही विद्यार्थ्यांनीही यावेळी आपले विचार मांडले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक वृंद, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तसेच आभार प्रदर्शन प्रा. विजय देशमुख यांनी केले.

### निवृत्ती वेतनधारकांचा संवाद मेळावा संपन्न; मान्यवरांनी केले मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : शासनसेवेतून वयोमानानुसार निवृत्ती वेतनधारकांचा संवाद मेळावा नुकतचा जिल्हा कोषागार कार्यालय येथे संपन्न झाला. यावेळी मान्यवरांनी जेष्ठ नागरिकांच्या अधिकाराबाबत मार्गदर्शन करुन निवृत्ती वेतन रक्कमेच्या गुंतवणुकीबाबत माहिती दिली. निवृत्ती वेतन संवाद मेळाव्यासाठी निवृत्तीवेतनधारक पेन्शन संघटनेचे जिल्हा अध्यक्ष व सदस्य प्रतिनिधी मोठ्या संखेने उपस्थित होते. तसेच जिल्हा विधी प्राधिकरण सचिव नितीन पाटील, भारतीय स्टेट बँकेचे राजे व. बोहरा, अप्पर कोषागार अधिकारी बबनराव इटे उपस्थित होते. जिल्हा निवृत्ती वेतनधारक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष डॉ. पहाड यांनी वेतनधारकांच्या समस्या, अडचणी सांगीतल्या. जिल्हा कोषागार अधिकारी ऋषीकेश वाघमारे यांनी निवृती वेतनधारकांच्या शंकाचे निरसन केले. तसेच पेन्शन धारकांकडून प्राप्त तक्रारी लेखी व तोंडी निवेदनाचे निवृत्ती वेतन शाखेतील कर्मचाऱ्यांनी निराकरण केले. कार्यक्रमाचे प्रस्तावना श्रीकृष्ण भराड यांनी केले. सुत्रसंचालन राहुल अमर भोलाने यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती मिना योगेश वानखेडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठो श्रीमती. सविता अढाव, जिवन काळे श्रीमतों, तृप्ती सरोदे, विनोद घट्टे, भास्कर नाटेकर, सचिन पाटील, श्रीमती प्रिती मांडवेकर, श्रीमतीह साधना माटे, नवनाथ बुनगे तसेच कोषागार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# तरुणांचा विकास हाच आमचा ध्यास : सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : हिंदूहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या तत्त्वावर संपूर्ण महाराष्ट्रात राजकारण केले आहे. राजकारणापेक्षा समाजकारणावर जास्त भर द्या, अशी शिकवण त्यांची होती. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीवर आजही शिवसेना व चालत आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेनाही सर्व सामान्य गोरगरिबांची पाठीराखी शिवसेना म्हणून ओळखली जात आहे. बाळासाहेबांच्या याच तत्वावर उबाठाचे शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे हे सुद्धा काम करीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातच मेहकर लोणार मतदार संघातील दहावीपासून उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांना सहज रोजगार उपलब्ध व्हावा, त्यांना रोजगाराची संधी मिळावी या दृष्टीने उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने दि.१८ ऑक्टोबर रोजी मेहकर येथील कृषी वैभव लॉन येथे भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या



मेळाव्यात दहावीपासून उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी सहभागी होऊन नोकरीची उपलब्ध झालेल्या संधीचे सोने करावे, असे आवाहन उत्कर्ष फाउंडेशनचे अध्यक्ष तथा शिवसेना नेते सिद्धार्थ खरात यांनी केले आहे. सामाजिक दृष्टिकोन ठेवून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने मेहकर मतदार संघातील तरुणांना सहज रोजगार उपलब्ध व्हावा, ग्रामीण भागातील




वाढत्या बेरोजगारीला आळा बसून युवकांच्या हाताला काम उपलब्ध व्हावे, या सामाजिक दृष्टिकोनातून दहावी बारावी ते विविध शाखेमधून उच्च शिक्षण घेणाऱ्या युवकांसाठी नामांकित कंपनीच्या सहभागात व वेतनावर रोजगार मिळवण्याची संधी मेहकर मतदारसंघातील युवकांना उपलब्ध करून दिली आहे. या रोजगार संधीच्या माध्यमातून युवकांना कॉर्पोरेट सेक्टरमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे मेहकर मतदार संघातील ग्रामीण तथा शहरी भागातील दहावी ते उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी या रोजगार मेळाव्यातून निर्माण झालेल्या संधीचा लाभ घ्यावा संधीचे सोने करावे असे आवाहन आयोजक सिद्धार्थ खरात यांनी केले आहे. या मेळाव्याचे उद्घाटन पश्रिचम विदर्भ शिवसेना संपर्कप्रमुख तथा खा. अरविंद सावंत यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. यावेळी बुलढाणा संपर्कप्रमुख नरेंद्र खेडकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवंत, जिल्हा उपप्रमुख आशिष रहाटे, मेहकर तालुकाप्रमुख निबांजी पांडव, लोणार तालुकाप्रमुख दीपक मापारी, मेहकर शहर प्रमुख किशोर गारोळे, लोणार शहरप्रमुख गजानन जाधव, मेहकर युवा सेना तालुकाप्रमुख आकाश घोडे, युवा सेना तालुकाप्रमुख जीवन घायाळ, मेहकर युवा सेना शाखाधिकारी ऋषी जगताप,लोणार युवा सेना शाखा अधिकारी श्रीकांत मादनकर, बुलढाणा महिला आघाडी जिल्हाप्रमुख संजीवनी वाघ, मेहकर महिला आघाडी शहर प्रमुख पौर्णिमा गवई यांची तसेच मेहकर लोणार मतदार संघातील विविध मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

### भव्य रोजगार मेळावा लाभ घ्या : सिद्धार्थ खरात यांचे आवाहन

मेहकर लोणार मतदार संघातील दहावी-बारावी, बीबीए, बीसीए, बीकॉम, बीएससी, बीए, एमए, एमबीए, बीफार्म,एमफार्म डिप्लोमा अशा सर्व शाखेतील पदवीधर तसेच दहावी बारावी शिक्षण घेतलेल्या युवकांना सहज आणि नामांकित कंपन्यांमध्ये आकर्षक पगारावर कॉर्पोरेट सेक्टरमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी मेहकर येथील कृषी वैभव लॉन डोणगाव रोड मेहकर येथे दि.१८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वेळेत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्याचा मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी लाभ घेऊन रोजगार मिळवावा, असे आवाहन आयोजक मंत्रालय सेवानिवृत्त सहसचिव तथा उत्कर्ष फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ रामभाऊ खरात यांनी केले आहे...

# ३ लाख ५१९१ मतदारांच्या हातात उमेदवारांचे भवितव्य ; ३५० मतदार केंद्र

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर मतदार संघात १५९०८६ पुरूष तर १४६१०१ स्त्री मतदार आहेत. व ४ तृतीयपंथी असे एकूण ३०५१९१ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत.यामध्ये मेहकर तालुक्यातील मतदार संख्या ही २१०९०३ आहे. तर लोणार तालुक्यातील मतदार संख्या ९४२८८ आहे. दिव्यांग मतदार संख्या १८२४ असून यामध्ये १,२०९ पुरुष व ६१५ स्त्री ची आहे. ८५ वर्षवयोगटापेक्षा जास्त मतदारांची संख्या ही ३८६५ आहे. मेहकर विधानसभा मतदार संघामध्ये एकूण ३५० मतदान केंद्र आहेत. मतदान केंद्राची वादी या वेबसाईटवर उपलब्ध आहे. यामध्ये मेहकर तालुक्यात मतदान



केंद्र संख्या २४३ असून लोणार तालुक्यात मतदान केंद्र संख्या १०७ आहे. असे एकूण ३५० मतदान केंद्र २०१ स्थळावर निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यापैकी शहरी क्षेत्रामध्ये २० मतदान केंद्र स्थळ आहेत. तर ग्रामीण क्षेत्रामध्ये १८१ मतदान केंद्र स्थळ आहेत. मतदारांना मतदार नोंदणी करण्याकरीता नामनिर्देशन पत्र भरण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या दहा दिवस अगोदर पर्यंत नाव नोंदणी करीता अर्ज भरता येत असून दि.१९ ऑक्टोबर २०२४ रोजी पर्यंत मतदार नोंदणी केलेले मतदार विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत मेहकर मतदार संघामध्ये आदर्श आचार संहिता पालन करण्याकरीता प्रशासनाच्या वतीने पथकांची नियुक्ती केली आहे. तसेच मतदारांना आदर्श आचार संहितेचे उल्लघंन करणाऱ्या विरुध्द तक्रार करण्यासाठी ॲप उपलब्ध करुन देण्यात आलेले असून त्यामधुन स्वताःच्या मोबाईल वरुन तक्रार नोंदविता येणार आहे. तसेच मतदारांना उमेदवारांची माहिती घधउ या ॲप वर सुद्धा मिळणार आहे.

भारत निवडणुक आयोगामार्फत विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ साठी निवडणुक कार्यक्रम घोषीत करण्यात आलेला आहे. दि.२२ ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणुक कार्यक्रमाची अधिसुचना प्रसिध्द करण्यात येणार आहे. व अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन दि.२९ ऑक्टोबर २०२४ रोजी पर्यंत नामनिर्देशन पत्र स्वीकारल्या जाणार आहे. नामनिर्देशन पत्राची छाननी दि.३० ऑक्टोबर २०२४ रोजी होणार असून दि.४ नोव्हेंबर २०२४ रोजी पर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत असणार आहे. दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार असून दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

### राष्ट्रीय खेळाडूकडून अल्पवयीन खेळाडूच्या करियरचा 'खेळ', स्पर्धेला नेताना अत्याचार

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय खो-खो खेळाच्या १३ वर्षीय मुलीवर प्रशिक्षकानंच अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. या प्रकरणी प्रशिक्षक, हॉटेल मालक, व्यवस्थापक यांच्यावर वेदांतनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्पर्धेसाठी मुंबईला जावं लागेल, असे सांगून प्रशिक्षकानं खेळाडू मुलीला रेल्वे स्टेशनला बोलावले. गाडी येण्यास वेळ लागणार असल्यानं त्यानं मुलीला हॉटेलवर नेले. गुरु-शिष्याला नात्याला काळिमा लावत प्रशिक्षकानं मुलीवर बळजबरीने अत्याचार केला.

# हत्येच्या वाढत्या सत्रावरून खा. बळवंत वानखडे व आमदार रवी राणा आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** :अमरावती शहरात हत्या करण्याचे सत्र हल्ली चांगलेच वाढले आहे त्यामुळे सर्वसामान्य नागरिका दहशतीत आहे वाढत्या हत्या रोखण्यास पोलीस प्रशासन मात्र अपयशी ठरत आहे. पोलीस प्रशासनाच्या या निष्क्रिय धोरणाबाबत खासदार बळवंत वानखेडे व आमदार रवी राणा यांनी आक्रमक पवित्रा घेत पोलीस प्रशासनावर रोष व्यक्त केला.

शहरात हत्यांचे सत्र वाढत असल्याने आ. रवी राणा.. आक्रमक झाल्या. तर खा.



बळवंत वानखडे यांनी देखील याची दखल घेत पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची भेट घेत हत्तेच्या वाढत्या घटनावर नाराजी व्यक्त करून गुन्हेगारांना पोलीस प्रशासनाने धडा शिकवावा अशा सूचना केल्या. अमरावती शहरात भ्रष्टवृत्तीमुळे पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहिला नाही. पोलिसांनी गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवावे, अन्यथा रस्त्यावर उतरावे लागेल असा इशाराही खा. वानखडे यांनी दिला.तर अमरावती मधील सर्व सामान्य लोक गुन्हेगारावर कारवाईसाठी रस्त्यावर येत आहे.सर्व सामान्य जनता गुन्हेगारीच्या दहशतीत आहे. त्यामुळे या गुन्हेगारावर कारवाई झाली पाहिजे तसेच तडीपार आरोपींना पट्टे मारून अटक करावी, अशी मागणी आ. रवी राणा यांनी केली.

पोलिसांनी तडीपार आरोपींना अटक न केल्यास पोलीस आयुक्त कार्यालयावर आंदोलन करेल, असा इशारा आ. रवी राणा यांनी दिला. शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर मात्र खासदार आमदार यांनी रोष व्यक्त करून याकडे पोलिसांनी गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली.

### 'हिरोगिरी फू फू करने में नही 'अक्षय कुमारची ही जाहिरात होणार बंद!

**मुंबई/प्रतिनिधी** : सहा वर्षापूर्वी अक्षय कुमारची 'हिरोगिरी फू फू करने में नहीं..' ही जाहिरात सर्वत्र प्रदर्शित करण्यात आली होती. सर्व टिव्ही माध्यमांसह अनेक चित्रपटगृहातही ही जाहिरात दाखवण्यात येत होती. परंतु सेन्सॉर बोर्डाने आता ही जाहिरात हटवण्याचा निर्णय घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २०१८ साली 'हिरोगिरी फू फू करने में नहीं.. असं म्हणत हॉस्पिटलबाहेर सिगारेट फुंकत उभारलेला नंदू आणि सायकलवरून येणाऱ्या अक्षय कुमार त्याला धुम्रपानापासून थांबवतो (एस्दझ्ग्हु ` ग्हरलीग्दले) आणि महिलांच्या मासिक पाळीसाठी लागणारे सॅनिटरी पॅड हातात देतो. मासिक पाळीत घाणेरडे कपडे वापरल्यामुळे होणाऱ्या गंभीर आजारांपासून स्वत: चे संरक्षण करण्यासाठी तो महिलांना पॅड खरेदी करण्याचा सल्ला नंदूला देत असतो', अशी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र सध्या या जाहिरातीच्या आधारे सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक मिम्स व्हायरल होत असल्यामुळे सेन्सॉर बोर्डाने ही जाहिरात काढून टाकण्याचा आदेश दिला आहे.

दरम्यान, ही जाहिरात काढून तंबाखू, धुम्रपान करणं हानीकारक असल्याचे सांगणारी एक नवी जाहिरात येणार असल्याचीमाहिती मिळत आहे.

# बिबी सुलतानपुर रोडवरील ए. एस. पेट्रोलपंपावर रात्री जबरी चोरी बीबी पोलीसांनी चार तासात अज्ञात आरोपीचा छडा लावून ताब्यात घेतले

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : आज दि. १६ आक्टोंबर रोजी पोलीस स्टेशन बीबी हद्दीत बीबी ते सुलतानपुर रोडवरील इंडियन ऑइल पेट्रोल पंप (ए. एस. पेट्रोलपंप) येथे रात्री ०१/३५ वा चे सुमारास अज्ञात आरोपीने पंपावरील सेल्समन (फिर्यादी) ला चाकुचा धाक दाखवुन त्याच्याकडील ७१५५०/ रुपये जबरदस्तीने चोरुन नेले.

याबाबत असे की,बीबी सुलतानपुर रोडवरील पंपावरील पेट्रोलमन ला चाकूचा धाक दाखवून त्याच्याजवळील रक्कम लंपास केली अशा फिर्यादी वरून बीबी पोलीसांनी भारतीय न्याय संहीता व शस्त्र अधिनीयम प्रमाणे गुन्हा दाखल करून सदर घटणेची माहीती प्राप्त होताच चे ठाणेदार संदिप पाटील व पोलीस अंमलदार यांचे पथकाने तात्काळ तपाची चक्र फिरवीत आरोपी पुर्ण पणे ओळख लपवुन आलेला असतांना पोलीसांनी आरोपीचा कसोशीने शोध घेवुन आरोपी बाळु ऊर्फ विश्वनाथ परसरम तेजनकर वय ३० वर्ष रा वाल्हुर ता लोणार जि बुलढाणा यास ताब्यात घेतले.




सदर आरोपीस विश्वासात घेवुन विचारपुस केली असता आरोपीने फिर्यादी सोबत संगणमत करुन पेट्रोलपंपावरील पैसे चोरी करण्यासाठी जबरी चोरीचा बनाव केल्याचे आरोपीच्या चौकशीत निष्पन्न झाले. सदर आरोपी बाळु ऊर्फ विश्र्वनाथ तेजनकर याचे कडुन गुन्हयातील गेलेला माल ७१५५०/रुपये, गुन्हयात वापरलेले हत्यार, वापरलेली दुचाकी (स्कुटी) तसेच घटनेवेळी आरोपीने ओळख लपवीण्यासाठी वापरलेले कपडे असा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर घटना घडल्याच्या माहीती वरुन घटणास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी तात्काळ भेट दिली व बीबी पोलीस स्टेशनच्या पोलीस पथकास मार्गदर्शन केले.

पोलीस स्टेशन बिबी चे ठाणेदार सपोनि संदिप पाटील, पोलीस अंमलदार परमेश्र्वर शिंदे, अरुण सानप, नितीन मापारी, यशवंत जैवळ, बद्री कायंदे, अशोक अंभोरे, अरुण माहीते, रवि बोरे, आकाश काळदाते यांनी ही कारवाई करून सदर आरोपींना चार तासात अटक केली.